# वाघ अभियांत्रिकीत उद्योगाभिमुख नवीन अभ्यासक्रमांची रचना

## उद्योजकांचे सहकार्य

**नाशिक :** येथील क. का. वाघ अभियांत्रिकी संस्थेत उद्योगाभिमुख नव्या अभ्यासक्रमांची सुरूवात होणार आहे. यामध्ये रोबोटिक्स ॲण्ड ऑटोमेशन, हीटिंग, व्हेंटिलेशन ॲण्ड एअर कंडीशनिंग, इंडस्ट्रियल ऑटोमेशन आदी विषयांचा समावेश आहे. यासाठी शहरातील उद्योजकांचे सहकार्य घेण्यात आले असून उद्योग विषयाशी संबंधित अभ्यासक्रम तयार करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य के. एन. नांदुरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वाघ अभियांत्रिकी केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणाचे सृजनशील विकेंद्रीकरणाचे ध्येय साधण्यासाठी काम करत आहे. संस्थेने अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत. तज्ज्ञ अभियंते यांनी हे प्रशिक्षण देणार आहेत.

नवीन शिक्षण धोरणात अभिप्रेत असलेल्या प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस या पदावर अशा तज्ज्ञांची नेमणूक करणाऱ्या देशातील मोजक्या महाविद्यालयांपैकी क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. रोबोटिक्स ॲण्ड ऑटोमेशन विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्माकर पवार यांनी उत्पादन क्षेत्राच्या सर्व विभागांमध्ये लीन मॅनेजमेंट या विषयाचा वापर वाढला असल्याचे सांगितले. प्रामुख्याने उत्पादकता वृद्धीची जपानमध्ये विकसित झालेली तंत्रे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतील. हीटिंग, व्हेंटिलेशन ॲण्ड एअर कंडिशनिंग यामध्ये विद्यार्थ्यांना चांगल्या नोकरीबरोबर या क्षेत्रात नवीन उद्योग सुरू करण्याची संधी मिळणार आहे.

### एका तुकडीत ६० विद्यार्थी

इंडस्ट्रियल ऑटोमेशनमध्ये विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक सर्किट्स तयार करणार आहेत. क्वांटम कंप्युटिंगमुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षेला नवे वळण मिळेल. डॉ. उदय वाड, जयंत कुलकर्णी, सुरेश दीडमिशे आणि अनिल आहेर यांनी प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रम तयार केला आहे. नव्या शैक्षणिक वर्षात या अभ्यासक्रमास सुरुवात होणार असून ६० विद्यार्थी एका तुकडीत असतील. पत्रकार परिषदेस संस्थेचे विश्वस्त अजिंक्य वाघ तसेच विविध शाखांचे प्रमुख उपस्थित होते.

**Loksatta 20-06-2025**